| | उद्यान व मैदान (1 एकर क्षेत्रापर्यंत) | | | ₹.25,000/- | 75,000/- | | 15,000/- |
| | (1 एकरच्या वरील क्षेत्रासाठी) | ₹.50,000/- प्रति ठिकाण | | ₹.25,000/- | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | रु.1,00,000/- प्रति ठिकाण | | 1,50,000/- | 25,000/- |
| 6 | रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी<br><br>अ) मंडप परवानगी (विक्री करीता)<br><br>ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br><br>क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)<br><br>ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | <br><br>रु.5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>रु.1.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>रु.1000 प्रति गेट / प्रति दिन<br><br>रु.3000 प्रति गेट / प्रति दिन | <br><br>-<br><br>-<br><br>-<br><br>- | <br><br>10.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>5000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br><br>10,000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | |
| 7 | सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान | रु.50 चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी)<br><br>Restrospective effect<br><br>ने अंमलबजावणी करणे | - | 100/- प्रति चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी)<br><br>Restrospective effect<br><br>ने अंमलबजावणी करणे | |

**<u>मिरा भाईदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>**

1) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्ता सेवाभावी / खाजगी संस्थांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार भाडयाने देण्यात याव्यात.
2) मालमत्ता 3 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.
3) सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यांच्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा बसवुन द्यावा लागेल. त्याचे मोजमाप सर्व मनपा हद्दीमध्ये समान राहील.
4) मालमतेची दैनंदिन साफसफाई व सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल, महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.
5) सदर मालमतेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.
6) सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेल.
7) मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

8) परस्पर इतर कोणत्याही संस्थेस अथवा इसमास सदर मालमत्ता देता येणार नाही.

9) सदर मालमत्ता दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती दयावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.

10) नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानूसार वेतन देणे बंधनकारक राहील.

11) सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

12) मालमत्तेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

13) दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.

14) सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.

15) संबंधित संस्थानी मालमत्ता कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती करणार तसेच महानगरपालिकेस त्या व्यतिरिक्त काय मदत करणार याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.

16) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमत्ता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

17) सदर संस्था महानगरपालिकेची कोणत्याही देयकाची थकबाकीदार नसावी.

18) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रक्कम ठरवून घेण्यात यावी.

19) सदर मालमत्ता सेवाभावी व धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेस भाड्याने देण्यात यावी.

20) वाहनतळ आरक्षणातील जागा धार्मिक व इतर कार्यक्रमासाठी भाडयाने देण्यात यावी.

21) सर्व मालमत्ता देताना भाडयासोबत जी.एस.टी. रक्कम वसुल करण्यात यावी.

22) यापुर्वी भाडयाने दिलेल्या व मुदत संपलेल्या तसेच करारनामा रद्द केलेल्या सर्व मालमत्ता रिकामी करून ताब्यात घेण्यात याव्यात व ठरविलेल्या भाडयानुसा अल्प मुदतीसाठी भाडयाने देण्यात याव्यात.

23) ज्या मालमत्तांची महानगरपालिका प्रशासनास आवश्यकता आहे अशा मालमत्ता भाडयाने देण्यात येऊ नये.

24) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अभ्यासिका, वाचनालय, व्यायामशाळा, रंगमंच, स्टेज, योगाशेड दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी सवलतीच्या दरात ना नफा ना तोटा तत्वावर वापर करणाऱ्यासाठी दर निश्चित करून स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागवून त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी सदर काम देण्यात यावे.

**महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.**

1) धार्मिक कार्यक्रम व नवरात्रोत्सवासाठी मैदाने भाडयाने देण्यासाठी मा. महासभेने ठरविलेले भाडे पहिल्या दिवसासाठी आकारण्यात येईल. तद्नंतर च्या दिवसासाठी रू.1000/- प्रति दिन भाडे आकारण्यात येईल.

2) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा वर्षातील 30 दिवसाकरीता भाडयाने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकाच्या वापरासाठी खुली राहील.

3) मैदाने / उद्याने व कोणत्याही मालमत्ता महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेच्या मालमत्ता कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत त्यासाठी उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

4) मैदाने, सभागृह व मालमत्ता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.

5) सभागृहात भोजन व खानपान व्यवस्था करता येणार नाही.

6) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.

7) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने याबाबत आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

8) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

10) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

11) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. परत द्यावयाचे झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

12) महापालिकेस मालमतेच्या जागा, सभागृहे / मैदाने यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदर बाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

13) कोणत्याही मालमतेबाबत वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त महोदय यांचे आदेश अंतिम राहतील व सदरचा आदेश संबंधितांवर बंधनकारक राहील.

14) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

15) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

16) मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन अगोदर 60 दिवस मैदान / सभागृह आरक्षित करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जांचा विचार करता येणार नाही.

17) मालमत्ता वापरासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना त्या अनुषंगाने येणारे नियम आदेश नियमावली न्यायालयाचे आदेश व मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे करावे लागेल. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (सुधारणा) अध्यादेश 1997 या महाराष्ट्र अध्यादेश क्र.14 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.37 (अ) नुसार.

18) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबधितांवर बंधनकारक राहतील.

19) महानगरपालिका मालमतेमध्ये कोणत्याही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबधित व्यक्ती / संस्थेची राहील.

20) सदर मालमत्ता नोंदणीकृत सेवाभावी संस्था, कोणत्याही नोंदणीकृत संस्था, कंपनी, भागीदारी संस्था यांना देण्यात येतील.

21) सदर मालमत्ता 60 दिवसाच्या आत आरक्षित करणे आवश्यक राहील.

22) लग्नकार्य, साखरपुडा इ. साठी मनपाचे कोणतेही मैदान व जागा भाडयाने देण्यात येणार नाही.

**<u>मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देण्याबाबत प्रस्तावित धोरण :</u>**

1) भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह, 6 x 4 फुटासाठी भाजी/ मासळी विक्रेत्यासाठी रु.500/- मटन विक्रेत्यांसाठी रु.1000/- प्रमाणे राहील. प्रतिवर्षी सदर भाडयात 10% वाढ करणेत येईल, अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2) भाजी मंडईतील गाळा 11 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहे.

3) ओटा फक्त भाजी, मासळी, फुल व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही सदर ओटात अर्जदार व त्यांचे कुटुंबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.

4) सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेच्या परवानगी घ्यावी लागेल.

5) मंडईची वेळ सकाळी 7.00 ते रात्री 8.30 वाजेपर्यंत राहील.

6) विक्रीचा माल फक्त देणेत आलेल्या गाळयामध्ये व ठेवणेचा असून अन्य मोकळी जागा त्यासाठी वापरणेची नाही.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकांने स्वखर्चाने करावयाचे आहे. मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्फोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजे.

13) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

14) सदर ओटयाची दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

15) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

16) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जागा "जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

17) अर्जदार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अर्ज सादर केल्यापासून मागील 3 वर्षापासून राहणारी असावी.

अ) जे अर्जदार मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/
संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार संस्थेचे अर्जदार संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल, (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) GST COUNCIL यांचे दिनांक 19/05/2017 रोजीच्या मंजुरीनुसार GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1) अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात Renting of immovable Property वर दिनांक 01 जुलै 2017 पासून 18% GST (GOODS & SERVICE TAX) लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क (GST) व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे, अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा 1% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदार संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

21) महानगरपालिकेने बांधलेले मार्केट मधील गाळे व इमारत संचलन देखभाल व दुरूस्तीसाठी कंत्राटदार नेमून दयावयाची असल्यास वरील धोरणानुसार भाडे व अटीशर्तीनुसार कंत्राटदार नेमण्यात यावा. सदर अधिकार आयुक्त यांना राहतील.

22) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

23) सद्यस्थितीत सदर जागा आधार नोंदणी, निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/शासकीय कामाकरीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र अर्जदारास जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

24) जागा भाडयाने उपलब्ध करून देणेकरीता प्राप्त अर्ज देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवलेले आहेत.

**<u>मोकळ्या जागेवर मार्केट मधील लाभार्थी निश्चित करणे</u>**

1) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्षेत्रातील रहीवाशांना मार्केटची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आरक्षणाच्या ताब्यातील व विकसित न झालेल्या जागा, मोकळ्या जागा यावर तात्पुरत्या स्वरूपात मा. आयुक्त यांनी जागा निश्चित करून मार्केट बांधण्यात यावेत. सदर मार्केटच्या जागा हया सर्व प्रभागात निश्चित करून खाजगी विकासकाकडून बांधून न घेता महानगरपालिकेमार्फत बांधण्यात यावेत. सदर मार्केटमध्ये शेड, कॉंक्रीट कोबा, शौचालय, पाणी इ. व्यवस्था करण्यात यावी.

2) सदर मार्केट मध्ये बसवावयाचे विक्रेते हे त्या प्रभागातील असावे व त्याच्याकडे 10 वर्षापासून विक्रेते असल्याचा पुरावा असावा. पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनी खोटी माहिती दिल्यास रू.50,000/- दंड वसुल करावा व दंड न भरल्यास सदर वसुली मालमता करातून करावे.सदर लाभार्थ्यांचा दुसरा व्यवसाय नसावा. नोकरी नसावी अथवा वाणिज्य गाळा नसावा.

3) सदर विक्रेत्यांची यादी मार्केट मधील जागे पेक्षा जास्त झाल्यास लॉटरी सिस्टीम ने जागा वितरीत कराव्या.

4) सदर विक्रेत्यांकडून रु.100/- प्रति दिन फी घेण्यात यावी. तसेच रु.1000/- लायसन्स फी घ्यावी.

5) शौचालय पे ॲन्ड यूज तत्वावर 15 वर्ष मुदतीसाठी बांधण्यास परवानगी देण्यात येईल. सदर संस्थांनी शौचालयाची देखभाल व दुरूस्ती व्यवस्थित न केल्यास 8 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करून शौचालय ताब्यात घेऊन महापालिकेमार्फत कर्मचारी अथवा संस्थेची नेमणूक करून देखभाल व दुरूस्ती करावी.

6) सदर मार्केटची साफसफाई, सुरक्षा व्यवस्था, पाणी व्यवस्था, संचलन करणाऱ्या कंत्राटदाराने करावी. वीज बिल महानगरपालिकेने अदा करावे.

7) सदर मार्केटच्या जागा व मार्केट बांधण्याचे काम बांधकाम विभागाने करावे व मार्केट मध्ये बसविण्यात येणारे विक्रेते यांची निश्चिती संबधित प्रभाग अधिकारी यांनी करावी.

8) सदर मार्केट संचलन व देखभालीसाठी आवश्यकता वाटल्यास खाजगी कंत्राटदार यांना देण्यात यावे.

9) सर्व प्रथम ज्या ठिकाणी अडथळा आहे त्या रस्त्यावरील फेरीवाले हटवून स्थलांतरीत करावे. तद्नंतर सदर रस्त्यावर पुन्हा फेरीवाले बसणार नाही याची दक्षता घ्यावी.

**शुटींग धोरण**

1) शुटींग करीता परवानगीसाठी संबधितांनी शुटींगच्या दिवसापूर्वी 5 दिवस आधी अर्ज करुन फी व अनामत रक्कम भरुन परवानगी घेणे बंधनकारक राहील, संबधित विभाग प्रमुख यांनी याबाबत दक्षता घ्यावी.

2) शुटींगसाठी परवानगी दिलेल्या क्षेत्रातील एजन्सी धारक यांना परवानगीची एक प्रत देण्यात यावी. विनापरवानगी शुटींग सुरु असल्याचे आढळल्यास संबधित मुकादम यांनी तात्काळ सदर घटनाप्रभाग मिळकत व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणावी.

3) विनापरवानगी शुटींग करताना आढळल्यास संबधिताकडून परवानगी फी 10 पट दंड वसूली करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

**स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच / फुटपाथ**

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना 3 वर्ष मुदतीसाठी निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा. महासभा दि.20/03/2013 ठराव क्र. 67 अन्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल. तसेच अर्ज आल्यास देखील करारनामा करुन संचलनास देण्यात यावा.

3) क्रिकेट पीच फुटबॉल पीच, स्केटींग जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया करुन संस्थेची निवड करण्यात यावी व तीन वर्ष मुदतीसाठी जागा भाड्याने देण्यात यावी.

4) शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करावे.

वरील धोरणास मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

PC-1/2025-26/pk/SG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक २८ मे 2025 रोजी

प्रक्र.२०) क्र. (९५) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाड्याने देणे साठी निश्चित करण्यात आलेला ठराव क्र. 159 दि.19/12/2022 मध्ये अंशत: बदल करणे बाबत मान्यता देणे.

ठराव क्र. ९५

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी विविध समाजमंदिर, सभागृह, उद्याने, मैदाने, व्यायमशाळा, बांधण्यात आलेली आहेत. सदर मालमत्ता नागरीकांना तसेच सार्वजनिक / खाजगी संरचना वापरण्यासाठी भाड्याने देण्यात येत आहेत. सदर मालमत्ता भाड्याने देण्यासाठी मा. प्रशासकीय ठराव दि.19/12/2022 ठराव क्र.159 अन्वये धोरण व भाडे निश्चित करण्यात आले आहे. तथापी सदर भाडे धोरणामध्ये महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देणे साठीचे धोरण यामधील अनुक्रमांक 16 मधील मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासुन पाहीजे आहे तो दिवस वगळुन आगोदर 30 दिवसाचा कालावधी आरक्षीत करण्यात आला होता. तथापी सदरचा कालावधी हा 30 दिवसां ऐवजी 60 दिवस असा बदल करण्यात येत आहे.

| अ. क्र. | मालमत्ता प्रकार | सद्याचे भाडे दर | | अनामत रक्कम | सुधारीत भाडेदर | | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | समाजमंदीरे / कम्युनिटी हॉल / इतर वास्तुमधील जागा / शाळेमधील वर्ग | | | | | | |
| | अ) (500 चौ. फुटापर्यंत) | रु.1500/- | | - | रु.3,000/- | | रु.5,000/- |
| | ब) (500 चौ.फुटवर) | रु.3,000/- | | - | रु.6,000/- | | रु.5,000/- |
| 2 | मंगल कार्यालय नगरभवन | | | | | | |
| | अ) (वातानुकुलित) | रु.10,000/- | | | रु.12,000/- | | |
| | ब) (विना वातानुकुलित) | रु.7,000/- | | | रु.10,000/- | | |
| | ओपन टेरेस | रु.5,000/- | | | रु.10,000/- | | |
| | दिवाबत्ती दर | रु.20/- प्रति युनिट | | रु.10,000/- | रु.20/- | | रु.10,000/- |
| | खुर्ची भाडे | रु.5/- प्रति नग | | | रु.10/- | | |
| | पाणी वापर, | रु.500/- | | | रु.750/- | | |
| | साफसफाई खर्च | रु.1,000/- | | | रु.1500/- | | |
| | मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी / अस्थायी कर्मचाऱ्यांना फक्त ( नगरभवन) डॉ. बा. आ.भ. येथील हॉल दरात 50% सवलत लागू राहील. | | | | | | |
| 3 | मैदाने, आरजी क्षेत्र, खुल्या जागा, उद्याने | लहान जागा आर.जी. व इतर भुखंड अ | मोठ्या जागा मैदान ब | क | लहान जागा व इतर भुखंड अ | मोठ्या जागा / मैदान ब | क |
| | अ) शाळेच्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | RG मोकळे भुखंड:<br>ब) खेळांसाठी/ क्रिडास्पर्धा<br>क)धार्मिक कार्यक्रमासाठी<br>ड) स्वातंत्र दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय व महत्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व पुण्यतिथी समारंभासाठी | रु.3,000/-<br>रु.3,000/-<br>रु.3,000/-<br>रु.3,000/- | रु.5,000/-<br>रु.5,000/-<br>रु.5,000/-<br>रु.5,000/- | रु.1,000/-<br>रु.1,000/-<br>रु.1,000/-<br>रु.1,000/- | रु.6,000/-<br>रु.5,000/-<br>रु.5,000/-<br>रु.5,000/- | रु.10,000/-<br>रु.10,000/-<br>रु.10,000/-<br>रु.10,000/- | रु.5,000/-<br>रु.2,000/-<br>रु.2,000/-<br>रु.2,000/- |
| 4 | **क्रिकेट खेळपट्ट्या**<br>**<u>सीझन खेळपट्टी</u>**<br>शाळा/ महाविद्यालयीन विद्यार्थी<br>शहरातील क्लब/संघ<br>शहराबाहेरील क्लब/संघ<br>**<u>मॅट क्रिकेट</u>**<br>शाळा /महाविद्यालयीन विद्यार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब/संघ<br>**<u>साधी खेळपट्टी</u>**<br>शाळा /महाविद्यालयीन विद्यार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब/संघ<br>**<u>टेनिस खेळपट्टी</u>**<br>शाळा /महाविद्यालयीन विद्यार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब/संघ | रु.100/-प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.600/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.800/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.250/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.1200/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.1800/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.1500/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.100/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.200/- प्रति दिन (दररोज 2 तास)<br>रु.400/- प्रति दिन (दररोज 2 तास) | | -<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>-<br>- | 500/- प्रति महिना<br>1500/- प्रति महिना<br>5000/- प्रति महिना<br>500/- प्रति महिना<br>2500/- प्रति महिना<br>2500/- प्रति महिना<br>500/- प्रति महिना<br>1500/- प्रति महिना<br>5000/- प्रति महिना<br>500/- प्रति महिना<br>500/- प्रति महिना<br>1000/- प्रति महिना | | |
| 5 | शुटींगसाठी रस्ता मालमत्ता भाड्याने देणे<br>रस्ता<br>उद्यान व मैदान<br>(1 एकर क्षेत्रापर्यंत)<br>(1 एकरच्या वरील क्षेत्रासाठी) | रु.25,000/- प्रति ठिकाण<br>रु.50,000/- प्रति ठिकाण<br>रु.1,00,000/- प्रति ठिकाण | | रु.25,000/-<br>रु.25,000/-<br>रु.25,000/- | 35,000/-<br>75,000/-<br>1,50,000/- | | 15,000/-<br>15,000/-<br>25,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी<br>अ) मंडप परवानगी (विक्री करीता)<br>ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव)<br>क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था)<br>ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | रु.5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>रु.1.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>रु.1000 प्रति गेट / प्रति दिन<br>रु.3000 प्रति गेट / प्रति दिन | -<br>-<br>-<br>- | 10.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>5000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन<br>10,000/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | |
| 7 | सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान | रु.50 चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) Restrospective effect ने अंमलबजावणी करणे | - | 100/- प्रति चौ. फुट प्रतिदिन दंड (विनापरवानगी) Restrospective effect ने अंमलबजावणी करणे | |

**<u>मिरा भाईदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>**

1) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्ता सेवाभावी / खाजगी संस्थांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार भाडयाने देण्यात याव्यात.
2) मालमत्ता 3 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.
3) सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यांच्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा बसवुन द्यावा लागेल. त्याचे मोजमाप सर्व मनपा हद्दीमध्ये समान राहील.
4) मालमतेची दैनंदिन साफसफाई व सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल, महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.
5) सदर मालमतेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.
6) सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेल.
7) मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
8) परस्पर इतर कोणत्याही संस्थेस अथवा इसमास सदर मालमता देता येणार नाही.
9) सदर मालमता दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती दयावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.
10) नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानूसार वेतन देणे बंधनकारक राहील.
11) सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

12) मालमतेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

13) दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.

14) सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.

15) संबंधित संस्थानी मालमता कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती करणार तसेच महानगरपालिकेस त्या व्यतिरिक्त काय मदत करणार याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.

16) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

17) सदर संस्था महानगरपालिकेची कोणेत्याही देयकाची थकबाकीदार नसावी.

18) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रक्कम ठरवून घेण्यात यावी.

19) सदर मालमत्ता सेवाभावी व धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेस भाड्याने देण्यात यावी.

20) वाहनतळ आरक्षणातील जागा धार्मिक व इतर कार्यक्रमासाठी भाडयाने देण्यात यावी.

21) सर्व मालमता देताना भाडयासोबत जी.एस.टी. रक्कम वसुल करण्यात यावी.

22) यापुर्वी भाडयाने दिलेल्या व मुदत संपलेल्या तसेच करारनामा रद्द केलेल्या सर्व मालमता रिकामी करुन ताब्यात घेण्यात याव्यात व ठरविलेल्या भाडयानुसा अल्प मुदतीसाठी भाडयाने देण्यात याव्यात.

23) ज्या मालमतांची महानगरपालिका प्रशासनास आवश्यकता आहे अशा मालमता भाडयाने देण्यात येऊ नये.

24) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अभ्यासिका, वाचनालय, व्यायामशाळा, रंगमंच, स्टेज, योगाशेड दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी सवलतीच्या दरात ना नफा ना तोटा तत्वावर वापर करणाऱ्यासाठी दर निश्चित करुन स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागवून त्यांना तीन वर्ष मुदतीसाठी सदर काम देण्यात यावे.

**<u>महानगरपालिकेच्या मालमता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठीचे धोरण.</u>**

1) धार्मिक कार्यक्रम व नवरात्रोत्सवासाठी मैदाने भाडयाने देण्यासाठी मा. महासभेने ठरविलेले भाडे पहिल्या दिवसासाठी आकारण्यात येईल. तद्नंतर च्या दिवसासाठी रु.1000/- प्रति दिन भाडे आकारण्यात येईल.

2) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा वर्षातील 30 दिवसाकरीता भाडयाने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकाच्या वापरासाठी खुली राहील.

3) मैदाने / उद्याने व कोणत्याही मालमता महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेच्या मालमता कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत त्यासाठी उपलब्ध करुन दयावयाची झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

4) मैदाने, सभागृह व मालमता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.

5) सभागृहात भोजन व खानपान व्यवस्था करता येणार नाही.

6) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.

7) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने याबाबत आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

8) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

10) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

11) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. परत द्यावयाचे झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

12) महापालिकेस मालमत्तेच्या जागा, सभागृहे / मैदाने यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदर बाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

13) कोणत्याही मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त महोदय यांचे आदेश अंतिम राहतील व सदरचा आदेश संबंधितांवर बंधनकारक राहील.

14) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

15) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

16) मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन अगोदर 60 दिवस मैदान / सभागृह आरक्षित करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

17) मालमत्ता वापरासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना त्या अनुषंगाने येणारे नियम आदेश नियमावली न्यायालयाचे आदेश व मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे करावे लागेल. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (सुधारणा) अध्यादेश 1997 या महाराष्ट्र अध्यादेश क्र.14 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.37 (अ) नुसार.

18) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

19) महानगरपालिका मालमत्तेमध्ये कोणत्याही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

20) सदर मालमत्ता नोंदणीकृत सेवाभावी संस्था, कोणत्याही नोंदणीकृत संस्था, कंपनी, भागीदारी संस्था यांना देण्यात येतील.

21) सदर मालमत्ता 30 दिवसाच्या आत आरक्षित करणे आवश्यक राहील.

22) लग्नकार्य, साखरपुडा इ. साठी मनपाचे कोणतेही मैदान व जागा भाडयाने देण्यात येणार नाही.

**मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देण्याबाबत प्रस्तावित धोरण :**

1) भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह, 6 x 4 फुटासाठी भाजी/ मासळी विक्रेत्यासाठी रु.500/- मटन विक्रेत्यांसाठी रु.1000/- प्रमाणे राहील. प्रतिवर्षी सदर भाडयात 10% वाढ करणेत येईल. अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2) भाजी मंडईतील गाळा 11 वर्षांच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहे.

3) ओटा फक्त भाजी, मासळी, फुल व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही. सदर ओटात अर्जदार व त्यांचे कुटुंबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.

4) सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेच्या परवानगी घ्यावी लागेल.

5) मंडईची वेळ सकाळी 7.00 ते रात्री 8.30 वाजेपर्यंत राहील.

6) विक्रीचा माल फक्त देणेत आलेल्या गाळयामध्ये व ठेवणेचा असून अन्य मोकळी जागा त्यासाठी वापरणेची नाही.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकांने स्वखर्चाने करावयाचे आहे. मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्फोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजे.

13) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

14) सदर ओटयाची दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

15) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

16) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जागा "जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

17) अर्जदार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अर्ज सादर केल्यापासून मागील 3 वर्षांपासून राहणारी असावी.

अ) जे अर्जदार मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/

संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार संस्थेचे अर्जदार संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल, (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छयांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

ब) GST COUNCIL यांचे दिनांक 19/05/2017 रोजीच्या मंजुरीनुसार GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1) अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात Renting of immovable Property वर दिनांक 01 जुलै 2017 पासून 18% GST (GOODS & SERVICE TAX) लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क (GST) व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे. अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा 1% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदार संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

21) महानगरपालिकेने बांधलेले मार्केट मधील गाळे व इमारत संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी कंत्राटदार नेमून दयावयाची असल्यास वरील धोरणानुसार भाडे व अटीशर्तीनुसार कंत्राटदार नेमण्यात यावा. सदर अधिकार आयुक्त यांना राहतील.

22) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

23) सद्यस्थितीत सदर जागा आधार नोंदणी, निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/शासकीय कामाकारीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र अर्जदारास जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

24) जागा भाडयाने उपलब्ध करुन देणेकरीता प्राप्त अर्ज देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा दयावी याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवलेले आहेत.

<u>मोकळ्या जागेवर मार्केट मधील लाभार्थी निश्चित करणे</u>

1) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्षेत्रातील रहीवाशांना मार्केटची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आरक्षणाच्या ताब्यातील व विकसित न झालेल्या जागा, मोकळ्या जागा यावर तात्पुरत्या स्वरुपात मा. आयुक्त यांनी जागा निश्चित करुन मार्केट बांधण्यात यावेत. सदर मार्केटच्या जागा ह्या सर्व प्रभागात निश्चित करुन खाजगी विकासकाकडून बांधून न घेता महानगरपालिकेमार्फत बांधण्यात यावेत. सदर मार्केटमध्ये शेड, कॉंक्रिट कोबा, शौचालय, पाणी इ. व्यवस्था करण्यात यावी.

2) सदर मार्केट मध्ये बसवावयाचे विक्रेते हे त्या प्रभागातील असावे व त्याच्याकडे 10 वर्षापासून विक्रेते असल्याचा पुरावा असावा. पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनी खोटी माहिती दिल्यास रु.50,000/- दंड वसुल करावा व दंड न भरल्यास सदर वसुली मालमत्ता करातून करावे.सदर लाभार्थ्यांचा दुसरा व्यवसाय नसावा, नोकरी नसावी अथवा वाणिज्य गाळा नसावा.

3) सदर विक्रेत्यांची यादी मार्केट मधील जागे पेक्षा जास्त झाल्यास लॉटरी सिस्टीम ने जागा वितरीत कराव्या.

4) सदर विक्रेत्यांकडून रु.100/- प्रति दिन फी घेण्यात यावी. तसेच रु.1000/- लायसन्स फी घ्यावी.

5) शौचालय पे ॲन्ड यूज तत्वावर 15 वर्ष मुदतीसाठी बांधण्यास परवानगी देण्यात येईल. सदर संस्थांनी शौचालयाची देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित न केल्यास 8 दिवसाची नोटीस देऊन

करारनामा रद्द करून शौचालय ताब्यात घेऊन महापालिकेमार्फत कर्मचारी अथवा संस्थेची नेमणूक करून देखभाल व दुरूस्ती करावी.

6) सदर मार्केटची साफसफाई, सुरक्षा व्यवस्था, पाणी व्यवस्था, संचलन करणाऱ्या कंत्राटदाराने करावी. वीज बिल महानगरपालिकेने अदा करावे.

7) सदर मार्केटच्या जागा व मार्केट बांधण्याचे काम बांधकाम विभागाने करावे व मार्केट मध्ये बसविण्यात येणारे विक्रेते यांची निश्चिती संबधित प्रभाग अधिकारी यांनी करावी.

8) सदर मार्केट संचलन व देखभालीसाठी आवश्यकता वाटल्यास खाजगी कंत्राटदार यांना देण्यात यावे.

9) सर्व प्रथम ज्या ठिकाणी अडथळा आहे त्या रस्त्यावरील फेरीवाले हटवून स्थलांतरीत करावे. तद्नंतर सदर रस्त्यावर पुन्हा फेरीवाले बसणार नाही याची दक्षता घ्यावी.

__शुटींग धोरण__

1) शुटींग करीता परवानगीसाठी संबधितांनी शुटींगच्या दिवसापूर्वी 5 दिवस आधी अर्ज करून फी व अनामत रक्कम भरून परवानगी घेणे बंधनकारक राहील. संबधित विभाग प्रमुख यांनी याबाबत दक्षता घ्यावी.

2) शुटींगसाठी परवानगी दिलेल्या क्षेत्रातील एजन्सी धारक यांना परवानगीची एक प्रत देण्यात यावी. विनापरवानगी शुटींग सुरु असल्याचे आढळल्यास संबधित मुकादम यांनी तात्काळ सदर घटनाप्रभाग मिळकत व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणावी.

3) विनापरवानगी शुटींग करताना आढळल्यास संबधिताकडून परवानगी फी 10 पट दंड वसूली करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

__स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच / फुटपाथ__

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरूस्तीसाठी देताना 3 वर्ष मुदतीसाठी निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा. महासभा दि.20/03/2013 ठराव क्र. 67 अन्वये निश्चित केलेल्या धोरणानूसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल. तसेच अर्ज आल्यास देखील करारनामा करून संचलनास देण्यात यावा.

3) क्रिकेट पीच फुटबॉल पीच, स्केटींग जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करून संस्थेची निवड करण्यात यावी व तीन वर्ष मुदतीसाठी जागा भाडयाने देण्यात यावी.

4) शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गैरजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करावे. वरील धोरणास मान्यता देण्यात येत आहे.

पारीत ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाविनोद अ. शर्मा)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

दि. २९/०५/2025

// गोषवारा //

**प्रकरण क्र.९६:- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरीता तसेच रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे करीता 100 मजुर 2 वर्ष मुदतीकरीता उपलब्ध करणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (ई ऑफिस :- 614653)**

(टेंडर आय डी :- 2025_MBMC_1148160_1)

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरीता तसेच रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे करीता 100 मजुर 2 वर्ष मुदतीकरीता उपलब्ध करणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांची ठराव क्र.473 दि.15/03/2024 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामाची फेर निविदा दि.08/02/2024 रोजीच्या दै. दोपहर का सामना व दि.09/02/2024 रोजीच्या दै. पुण्य नगरी या वृत्तपत्रात या वृत्तपत्रात तसेच राज्य शासनाच्या ई-टेंडरिंग संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in यावरही प्रसिध्द केलेली होती. सदर कामी ई-टेंडरींग पध्दतीने विहित मुदतीत 05 निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

वरीलप्रमाणे प्राप्त 05 निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.07/03/2025 रोजी उघडण्यात आले असता 1) अल्फाकॉम सर्विसेस इंडिया, 2) गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., 3) श्री साई गणेश कंस्ट्रक्शन, 4) सिताराम ट्रॅव्हल्स व 5) सिक्स सेन्स कमर्शियल प्रा.लि. यांनी महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तांत्रिक लिफाफामध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता मा. निविदा समितीच्या दि.08/04/2025 रोजीच्या मंजूरीने पात्र 5 निविदाधारकांचा दराचा लिफाफा दि.15/04/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आलेला आहे. सदर 5 निविदाधारकांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदेतील दराचा तपशिल | पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सिताराम ट्रॅव्हल्स | अल्फाकॉम सर्विसेस इंडिया | सिक्स सेन्स कमर्शियल प्रा.लि. | गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | श्री साई गणेश कंस्ट्रक्शन |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Contract Labour | | | | | |
| 1.1 | Rate per day/ Per Labour - 989/- (This rate is freezed) (Please Refer tender Document) | | | | | |
| 1.2 | Service Charges/ Administration charges (Range 3.85% to 7%) | रु.38.00/- | रु. 38.07/- | रु.38.07/- | रु. 38.08/- | रु.38.08/- |

केंद्र शासनाच्या वित्त विभागाचे दि.17/01/2024 चे O.M. मध्ये O.M. क्रमांक 6/1/2023-पीपीडी दिनांक 06.01.2023 द्वारे जारी केलेल्या सुचनांमध्ये निविदा कागदपत्रांमध्ये फक्त 3.85% ते 7% पर्यंत किमान सेवा शुल्क विहित करण्याची तरतूद आहे. तथापि मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांनी निविदेत सर्व्हिस चार्जेस करीता सादर केलेले दर रु.38.00/- हे दर 3.85% पेक्षा कमी दराचे आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकारणे योग्य होणार नाही. तसेच सदर निविदेत निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापैकी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन यांचे निविदेमध्ये नमूद सर्व्हिस चार्जेसचे दर सम-समान असून ते रक्कम रु.38.08/- (प्रती दिन /प्रती मजूर) हे दर इतर तीन निविदाधारकांच्या दराच्या तूलनेत योग्य व वाजवी असल्यामुळे मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन त्यांचे निविदेमधील उक्त दरास मंजूरी देणेकरीता दि.22/04/2025 रोजीची मा. निविदा समितीने शिफारस केली आहे.

तरी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन यांचे 100 मजूर पुरवठा करण्याचे सर्व्हिस चार्जेसचे सर्वात योग्य व वाजवी दर रक्कम रु.38.08/- (प्रती दिन /प्रती मजूर) सम-समान असल्यामुळे दोन्ही कंत्राटदाराकडून प्रत्येकी 50 मजूर दोन वर्षे मुदतीसाठी पुरवठा करणे करीता व याकामी होणाऱ्या रक्कम रु.7.20 कोटी इतक्या खर्चास तसेच निविदेतील दरास मंजूरी मिळणेस, तसेच संबंधीत निविदाधारक समवेत करारनामा करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
अति. आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

## प्रशासकिय सभा दि.२०/ ५ /2025

**प्रकरण क्र. ८८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरीता तसेच रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे करीता 100 मजुर 2 वर्ष मुदतीकरीता उपलब्ध करणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (ई ऑफिस :- 614653)**

**(टेंडर आय डी :- 2025_MBMC_1148160_1)**

ठराव क्र. ८८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरीता तसेच रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करणे करीता 100 मजुर 2 वर्ष मुदतीकरीता उपलब्ध करणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांची ठराव क्र.473, दि.15/03/2024 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सदर फेर निविदा दि.08/02/2024 रोजीच्या दै.दोपहर का सामना व दि.09/02/2024 रोजीच्या दै. पुण्य नगरी या वृत्तपत्रात या वृत्तपत्रात तसेच राज्य शासनाच्या ई-टेंडरिंग संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in यावरही प्रसिध्द केलेली होती. सदर कामी ई-डेंडरींग पध्दतीने विहित मुदतीत 05 निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

वरीलप्रमाणे प्राप्त 05 निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.07/03/2025 रोजी उघडण्यात आले असता 1) अल्फाकॉम सर्विसेस इंडिया, 2) गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., 3) श्री साई गणेश कंस्ट्रक्शन, 4) सिताराम ट्रॅव्हल्स व 5) सिक्स सेन्स कमर्शियल प्रा.लि. यांनी महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तांत्रिक लिफाफामध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता मा. निविदा समितीच्या दि.08/04/2025 रोजीच्या मंजूरीने पात्र 5 निविदाधारकांचा दराचा लिफाफा दि.15/04/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आलेला आहे. सदर 5 निविदाधारकांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदेतील दराचा तपशिल | पात्र निविदाधारकांनी सादर केलेले दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सिताराम ट्रॅव्हल्स | अल्फाकॉम सर्विसेस इंडिया | सिक्स सेन्स कमर्शियल प्रा.लि. | गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | श्री साई गणेश कंस्ट्रक्शन |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Contract Labour | | | | | |
| 1.1 | Rate per day/ Per Labour -[illegible]/- (This rate is freezed) (Please Refer tender Document) | | | | | |
| 1.2 | Service Charges/ Administration charges (Range 3.85% to 7%) | ₹.38.00/- | ₹. 38.07/- | ₹.38.07/- | ₹. 38.08/- | ₹.38.08/- |

केंद्र शासनाच्या वित्त विभागाचे दि.17/01/2024 चे O.M. मध्ये O.M. क्रमांक 6/1/2023-पीपीडी दिनांक 06.01.2023 द्वारे जारी केलेल्या सुचनांमध्ये निविदा कागदपत्रांमध्ये फक्त 3.85% ते 7% पर्यंत किमान सेवा शुल्क विहित करण्याची तरतूद आहे. तथापि मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांनी निविदेत सर्व्हिस चार्जेस करीता सादर केलेले दर रु.38.00/- हे दर 3.85% पेक्षा कमी दराचे आहेत. त्यामुळे त्यांची निविदा स्विकारणे योग्य होणार नाही. तसेच सदर निविदेत निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापैकी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन यांचे निविदेमध्ये नमूद सर्व्हिस चार्जेसचे दर सम-समान असून ते रक्कम रु.38.08/- (प्रती दिन /प्रती मजूर) हे दर इतर तीन निविदाधारकांच्या दराच्या तूलनेत योग्य व वाजवी असल्यामुळे मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन त्यांचे निविदेमधील उक्त दरास मंजूरी देणेकरीता दि.22/04/2025 रोजीची मा. निविदा समितीने शिफारस केली आहे.

तरी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. श्री साई गणेश कंस्ट्रक्शन यांचे 100 मजूर पुरवठा करण्याचे सर्व्हिस चार्जेसचे सर्वात योग्य व वाजवी दर रक्कम रु.38.08/- (प्रती दिन /प्रती मजूर) सम-समान असल्यामुळे दोन्ही कंत्राटदाराकडून प्रत्येकी 50 मजूर दोन वर्षे मुदतीसाठी पुरवठा करणे करीता व याकामी होणाऱ्या रक्कम रु.7.20 कोटी इतक्या खर्चास तसेच त्यांचे निविदेतील दरास मंजूरी देणेत येत आहे. तसेच संबंधीत निविदाधारक समवेत करारनामा करुन कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

श्री. राधाबिनोद अ. शर्मा, भा. प्र. से.
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका